# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २३७

**(सभावृत्तांत)**

**दिनांक- २५/०८/२०२१** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **२५/०८/२०२१** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

1. **मा.अभिषेक गोविंद बारणे**

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.विकास ढाकणे- अतिरिक्त आयुक्त(१), मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले- मुख्य लेखापरिक्षक हे अधिकारी उपस्थित होते.

----------

सन्मानिय उपस्थित सन्माननीय सदस्यांच्या संमतीने गणसंख्ये अभावी दि.२५/०८/२०२१ रोजी दु.२:३० वा ची मा.स्थायी समिती सभा (कार्यपत्रिका क्र.२३७) दि.०१/०९/२०२१ रोजी दु.२.१५ पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक- २३७

**(सभावृत्तांत)**

**(दि.२५/०८/२०२१ ची तहकूब सभा)**

**दिनांक- ०१/०९/२०२१** **वेळ – दु.२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **दि.२५/०८/२०२१ ची तहकूब** सभा बुधवार, दिनांक ०१/०९/२०२१ रोजी दु.०२.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील मा.सभापती, स्थायी समिती यांचे दालनातून मा.सभापती, स्थायी समिती हे मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य ऑनलाईन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित होते.

१. **मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे - सभापती**
२. मा.कदम शशिकांत गणपत
३. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.बुर्डे सुवर्णा विकास
६. मा.फुगे भिमाबाई पोपट
७. मा.भोईर सुरेश शिवाजी
८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले- मुख्य लेखापरिक्षक, मा.राजन पाटील- शहर अभियंता, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.इंगळे, मा.चारठाणकर, मा.खोत- उप आयुक्त, मा.सवणे - सह शहर अभियंता, मा.लडकत, मा.खाबडे- प्र.सह शहर अभियंता, मा.बहुरे, मा.देशमुख, मा.गायकवाड, मा.थोरात- सहाय्यक आयुक्त, मा. डॉ. वाबळे- अधिष्ठता वाय.सी.एम.एच., मा.देशमुख, मा.पवार, मा.वाघुंडे, मा.नरोन्हा- कार्यकारी अभियंता, मा.दगडे- पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जरांडे- सुरक्षा अधिकारी, मा.बहादद्रपुरे- समाज विकास अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२३६ दि.१८/०८/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------------

ठराव क्रमांक- १०१७९ विषय क्रमांक- ०१

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- स्थापत्य क मुख्य

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/८१५/२०२१, दि.१६/०७/२०२१.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.69/10/2020-21अन्वये प्रभाग क्र.६ मध्ये पूर्व भागात खड्डे व चरांची डांबरीकरणाचे सुधारणा करणेकामी मे.धनेश्वर कन्स्ट्रक्शन नि.र.रू.29,92,295/- (अक्षरी र.रु.एकोणतीस लाख ब्यान्नव हजार दोनशे पंच्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.28,91,145/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.28,91,145/- पेक्षा 10.50% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2020-21चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 12.79% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.25,87,575/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.39,866/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,01,150/- = एकुण र.रु.27,28,591/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८० विषय क्रमांक- ०२

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- मध्य साहित्य भांडार,वैद्यकिय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/८८२/२०२१, दि.३०/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

वैद्यकीय विभाग कोविड-१९ कामकाजाकरीता शासनाकडील नोंदणीकृत संस्थेमार्फत मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेबाबत मे.ब्रिस्क इंडीया प्रा लियांना आदेश क्र.मसाभां/५/कावि/३६३/२०२१ दि.०९/०४/२०२१ कार्यारंभ आदेश देणेत आला असून ठराव क्र.९१९३ दि.१५/०४/२०२१ अन्वये मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिली आहे. मे.ब्रिस्क इंडीया प्रा लियांचा २ महिन्याचा कालावधी माहे जुन दि.०८/०६/२०२१ रोजी संपुष्टात आला आहे. सद्यस्थितीत कोविड-१९ लसीकरण केंद्रावरील कामकाजाकरीता मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यानुसार कोविड -१९ चा प्रादुर्भाव रोखणे व सदरचे लसीकरणाचे काम तातडीने करणे आवश्यक असलेने मे.ब्रिस्क इंडीया प्रा लियांना यापुर्वीचे ठराव क्र.९१९३ दि.१५/०४/२०२१

अन्वये मा.स्थायी समिती सभेची मान्यता, आदेशातील अटी शर्ती तसेच कामगार कल्याण अधिकारी यांनी निश्चित केलेले किमान वेतन दरास आधीन राहून २ महिले कालावधी करीता मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(६)(क) यास अधिन राहून कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेसाठी मे.ब्रिस्क इंडीया प्रा. लि.यांचेकडून ५० कोविड लसीकरण केंद्राकरीता की ५० स्टाफनर्स, २५ डेटाएन्ट्री ऑपरेटर, २५ वॉर्डबॉय/ वार्डआया असे एकूण १०० कुशल/ अकुशल मनुष्यबळाची २ महिने कालावधी करीता करारनामा करुन नेमणूक करणेकामी येणा-या एकूण र.रु.५०,८१,२००/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख एक्याऐंशी हजार दोनशे फक्त) चे खर्चास तसेच यापुर्वीचे ठराव क्र.९१९३ दि.१५/०४/२०२१ अन्वये मा.स्थायी समिती सभेची मान्यता, यापुर्वीचे आदेशातील अटी शर्ती तसेच कामगार कल्याण अधिकारी यांनी निश्चित केलेले किमान वेतन दरास आधीन राहून २ महिने कालावधी करीता मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८१ विषय क्रमांक- ०३

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ह मुख्यालय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/८१७/२०२१, दि.१९/०७/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.3/1/2021-22अन्वये प्रभाग क्र.३० दापोडी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते बोपोडी पूल रस्ता अद्ययावत पध्दतीने विकसित करणेकामी मे.आरई इन्फ्रा.प्रा.लि. नि.र.रू.8,23,84,102/- (अक्षरी रक्कम रुपये आठ कोटी तेवीस लाख चौ-याऐंशी हजार एकशे दोन फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.8,14,57,102/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.8,14,57,102/- पेक्षा 30.11% कमी म्हणजेच र.रु.5,69,30,369/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.5,38,152/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.9,27,000/- = एकुण र.रु.5,83,95,521/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८२ विषय क्रमांक- ०४

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- वैद्यकिय

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/७४५/२०२१, दि.१२/०८/२०२१

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असलेने M/s. Jess Ideas Pvt.Ltdयांना अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथे जंबो कोविड रुग्णालय उभारणीसाठी पायाभूत सुविधा (Oxygenated Beds with provision of contactless booths and Nurse station, and admission desk, Critical Care Beds (ICU + HDC + Admn Area + Pathlabs + Octonorm Room , Utility Area, Donning, Doffing, (Oxygenated Beds with provision of contactless booths and Nurse station, and admission desk, Critical Care Beds (ICU + HDC + Admn Area + Pathlabs + Octonorm Room , Utility Area, Donning, Doffing, Command Centre, Admn Area etc., Washrooms – Proper segregation shall be done for patient usage and staff usage, Mortuary, Disinfection area Bio-Medical waste, laundry, Space for AHU, space for LMO Plant and Manifold room, visitors parking, staff parking Ambylance parking, stores etc..)etc..) तिनमहीन्यासाठी कामकाज आदेश देण्यात आले होते. दि. ३१.०५.२०२१ रोजी सदर मुदत पूर्म झाली आहे परंतु २०० बेडसाठी मे.मेडब्रोज हेल्थकेअर यांना १ महीन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. मे.जेस आयडीयाज प्रा.ली. यांना सुध्दा ०१.०६.२०२१ ते १५.०८.२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. एकूण र.रु. ४,७२,००,०००/- एवढा खर्च येणार आहे. या साठी त्यांना PMRDA ने दिलेल्या आणि या पूर्वी दिलेल्या आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८३ विषय क्रमांक- ०५

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- पाणीपुरवठा

सुचक- मा. शत्रुघ्न काटे अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.जशुके/पापु/१६८/२०२१ दि.०६/०८/२०२१

विषय क्रमांक- ०५ चा विचार पुढील सभेच्यावेळी करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८४ विषय क्रमांक- ०६

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- ह क्षेत्रीय

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षे/भुजि/कावि/१२७/२०२१, दि.०२/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

ह क्षेत्रिय कार्यालयांतर्गत पिंपरी-१८ येथील स.न.२१०,सि.स.नं. ४८०१, क्रोमा बिल्डींग शेजारील मनपा वाहनतळ जागा ही अंध व अपंगासाठी राखीव असलेले वाहनतळ श्री राजीव दयानंद काटे रा. औंध पुणे- ०७ यांना मासिक दर र.रु. ३०,०००/- याप्रमाणे ११ महीन्याकरीताचा एकरक्कमी दर र.र ३,३०,०००/ भाडे व त्यावर १८% जी.एस.टी र.र ५९,४००/- व चार माहिन्याचे अनामत र.रु.१,२०,०००/- इतकी अशी र.र.५,०९,४००/- एकरक्कमी भरुन आगाऊ एक रक्कमी भरुन घेण्यात येऊन रजिस्टर्ड करारनामा करुन ११ महिन्याकरीता भाड्याने देणेकामी मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८५ विषय क्रमांक- ०७

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- स्थापत्य ब मुख्य

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/ब-मुख्य/९५३/२०२१, दि.०९/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. 1/01/2021-22 अन्वये प्रभाग क्र १६ वाल्हेकरवाडी येथे प्राधिकरण कडून आलेल्या जागेवर शाळा इमारत बांधणे. कामी मे. यशराज ग्लोबल इन्फ्राकॉन एलएलपी नि.र.रू. 118452883/- (अक्षरी रक्कम रुपये अकरा कोटी चौ-याऐंशी लाख बावन्न हजार आठशे ञ्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु. 118114383/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार विषयांकित काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु. 118114383/- पेक्षा 19.81%कमी म्हणजेच र.रु. 94715924 /- +रॉयल्टी चार्जेस र.रु. 1131790/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु. 338500/- = एकुण र.रु. 96186214 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८६ विषय क्रमांक- ०८

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- आरोग्य मुख्य

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आमुका/९/कावि/१५६/२०२१, दि.१३/०८/२०२१.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत ई-निविदा नोटीस क्र.३/२०१७-१८ व ८/२०१७-१८ प्रसिध्द करुन म.न.पा.चे “अ”,“ब”,“क”,“ड”,“इ”,“फ” “ग” व “ह” क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते/गटर्स साफसफाई करणेकामी किमान वेतन दराने कामगार उपलब्ध करणे याकामासाठी २ वर्ष कालावधीसाठी किमान वेतनावरील सेवा शुल्कावर निविदा मागविण्यात आली होती. त्यानुसार ८ क्षेत्रिय कार्यालयाकडे किमान वेतन दरानुसार ६ संस्थांमार्फत १५२९ सफाई कामगार पुरविण्यात आलेले आहे. या ६ संस्थापैकी १ ते ४ संस्थांचे कामाची मुदत दिनांक २५/०६/२०२१व ५ ते ६ संस्थांची कामाची मुदत दि.३०/०६/२०२१ रोजी संपुष्टात आल्याने, त्यांना अनुक्रमे दि. २५/०३/२०२१ व दि.३०/०६/२०२१ अखेरपर्यंत मुदतवाढ देणेत आली आहे. सदरची मुदतवाढ संपुष्टात येत असलेने व मनुष्यबळाव्दारे रस्ते/गटर्स साफ सफाई कामाची नविन निविदा रद्द करणेत येवुन, फेरनिविदा कामकाज सुरू असून, याकामकाजाकरीता अंदाजे २महिने कालावधी लागणार असलेने, सदर कामास किमान २ महिने कालावधीकरीता तथा निविदा प्रक्रिया पुर्ण होवून प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल यापैकी जे प्रथम होईल तोपर्यंत मुदतवाढ देवून याकामी येणा-या र.रु. 7,10,44,170/- इतके अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता मिळणे तसेच संबधीतांबरोबर २ महिने कालावधीचा किंवा टेंडर मंजूर झाले तर दोन्हीपैकी ज्याची मुदत अगोदर संपेल त्याप्रमाणे करारनामा करून घेणे तसेच त्यांना कामाचे आदेश देणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७३ (क) नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८७ विषय क्रमांक- ०९

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१३२८/२०२१, दि.१३/०८/२०२१.
मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या विविध रुग्णालये,कोविड केअर सेंटर ई.ठिकाणी कोरोना विषाणु बाधित रुग्णांवर उपचार करतानाआवश्यकअसणारे**PPE Kit with N95 Mask** खरेदीकरणेकामीई निविदा सुचनासुचना क्र.२७/२०२१-२२ प्रसिध्द करण्यात आली होती .कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व (Covid-19) रुग्णांवर वैदयकिय उपचार करणेसाठी आवश्यक असणारे **PPE Kit with N95 Mask** करीतामे.पारस डाईग ॲन्ड प्रिंटीग

मिल्स यांचे प्राप्त लघुत्तम दरानुसार र.रु.81,00,000/-+ GST ( निविदा र.रु ९७,००,०००/- पेक्षा १६.४९% ने कमी आहे.) चे खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १७९७,सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दिनांक १४/०३/२०२०व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम ४१ व ५० व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार खरेदी करणेकामी करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८८ विषय क्रमांक- १०

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- मध्यवर्ती साहित्य भांडार, वैद्यकिय

सुचक- मा. कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा. बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/१३२९/२०२१, दि.१३/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग नियंत्रण अनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७ (३) (क) यास अधिन राहून कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीन परिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी Antigen Test kits खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या ई-निविदेच्या अनुषंगाने M/s.Sudharshan Pharma Industries Ltd., यांचेकडून **ImmunoScience India Pvt. Ltd., Pune कंपनीचे ImmunoQuick Covid-19 Ag - Rapid Antigen Test** ८,००० किटस् (२,००,००० टेस्ट 25 Test per Kit Rate per Test Rs.२५.१५ अधिक ५% GST र.रु. १.२६ प्रमाणे प्रति टेस्ट र.रु.२६.४१ या दराने खरेदी करण्यास व (निविदा र.रु. ७९,९०,०००/-पेक्षा ३७.०४% कमी दराने) येणा-या र.रु.५०,३०,०००/- अधिक ५% GST चे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१८९ विषय क्रमांक- ११

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- ह क्षेत्रीय,स्थापत्य

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति आयुक्त(१) यांचे पत्र क्र.इ/स्था/कावि/६८९/२०२१, दि.१२/०८/२०२१.

मा.अति आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे इ विभागीय कार्यक्षेत्रातील सन २०२०-२१ साठी प्रभाग क्र.७ भोसरी मध्ये करसंकलन इमारती शेजारील मनपाच्या ताब्यातील जागेमध्ये बहुउद्देशीय हॉल बांधणे. या कामास महापालिका सभा समिती ठराव क्र.५५३. दि.४/६/२०२०. चे अन्वये र.रु.५,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. प्रस्तुत कामाचे नियोजन करणेकामी प्रकल्प सल्लागार नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर कामाचे नकाशे, आराखडा तयार करणे व

गुणवत्ता तपासणी इ निविदा पश्चात (post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची कार्यकारी अभियंता यांच्या मंजूरीनुसार दरसुची दि.०७/०२/२०२० रोजी मागविण्यात आले आहे. त्यानुसार मे. नियोजन कन्स्टल्टंट यांचेकडून १.४८ % इतका लघुत्तम दर प्राप्त झाला आहे. सदर प्रकल्पासाठी मनपाच्या पॅनलवर प्रकल्प सल्लागार मे. नियोजन कन्स्टल्टंट , पुणे यांची नियुक्ती करणेत आलेली आहे. प्रकल्प सल्लागार यांनी यापुर्वी देखील अशा प्रकारची कामे केलेली आहेत . व सध्या काही कामे प्रगती पथावर आहेत. वरील बाबींचा विचार करता उपरोक्त सदर कामासाठी मे. नियोजन कन्स्टल्टंट, पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणुक करणेचा प्रस्ताव निविदा पुर्व १.४८% निविदा पश्चात (post Tender Activity)कामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणुक करणेस व प्रकल्प खर्चाच्या १.४८% फी अदा करून मे. नियोजन कन्स्टल्टंट, पुणे यांची प्रकल्प सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९० विषय क्रमांक- १२

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- वैद्यकिय

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/९/कावि/७४८/२०२१, दि.१३/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.आयुक्त, मा.महापौर,मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे टप्प्या टप्प्याने कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय ८०० बेड साठी दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश देण्यात आले होते. दि. २५.०५.२०२१ पासुन बेडसंख्या कमी करणेत आली आहे. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोसिटक सेंटर यांना देण्यात आलेल्या ८०० बेड आदेशांपैकी ४०० बेड बंद करणेत आले होते आणि २०० बेड साठी टप्प्या टप्प्याने दिलेल्या आदेशांची मुदत अनुक्रमे २८.०५.२०२१ आणि ३१.०५.२०२१ रोजी पूर्ण होत होती. आयसीयु आणि ऑक्सीजन बेडची आवश्यकता लक्षात घेता दि. ०१.०७.२०२१ ते १५.०८.२०२१ पर्यत १४० ऑक्सीजन युक्त बेड आणि ६० आयसीयु बेड चालु ठेवणेकामी त्यांना एकूण र.रु. २,११,४९,९९०.४० चे आदेश देणेत आले आहेत. मे.मेडब्रोज हेल्थकेअर डायग्नोसिटक सेंटरयांना PMRDA कडील मुळ आदेशामध्ये नमुद केले प्रमाणे तसेच पुणे महानगरपालिके कडील आदेशातील व करारनाम्यातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहणार आहेत. वाढती रुग्णसंख्या विचारात घेता भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता सदर बाब तातडीची असेलेने दि. ०१.०७.२०२१ ते १५.०८.२०२१ (४६ दिवस) २०० बेडसाठी (ऑक्सीजन युक्त१४० बेड आणि आयसीयु ६० बेड) ) साठीआदेश देण्यात आलेले आहेत. एकूण र.रु. २,११,४९,९९०.४०चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १०१९१ विषय क्रमांक- १३

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- वैदकिय

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/७७३/२०२१,संदर्भ- दि.१७/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात कोरोना रुग्णांची संख्या पुन्हा वाढु लागली होती. जुलै महीन्यामध्ये कोरोना प्रादुर्भाव वाढला असता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA) यांचे कडुन EOI क्र. ०४/२०२०-२१ प्रसीध्द करण्यात आला होता त्या मध्ये M/s. AAA Healthcare यांना कामाचे आदेश क्र.EG/मकोहॉ/07.20/प्र.क्र ६१२/०४५४/ शाखा-१ दि. २४.०९.२०२० अन्वये अण्णासाहेब मगर स्टेडियम येथील जंबो कोविड रुग्णालयालाठी Consultancy Services for Planning Construction, Operation and Maintenance of 800 Bedसाठी आदेश देण्यात आले होते.मा.आयुक्त, मा.महापौर,मा.अति.आयुक्त क्र.१ तसेच इतर पदाधिकारी आणि अधिकारी यांचे समवेत दिनांक २२.०३.२०२१ मिटींग आयोजीत केली असता झालेल्या चर्चे प्रमाणे मा.आयुक्त यांनी कै.अण्णासाहेब मगर स्टेडीयम येथील जंबो कोविड रुग्णालय टप्प्या टप्प्याने २०० बेड (१०० बेड ऑक्सीजन युक्त + ५० एचडीयु + ५० आयसीयु) साठी दोन महिने कालावधीसाठी चालु करणेकामी आदेश देणेत आले होते. तसेच कोविडसाठी कार्यकारणी समिती गठीत करण्यात आलेली आहे त्या समितीच्या दिनांक २३/०३/२०२१ रोजी झालेल्या मिटींग मधील निर्णया प्रमाणे सदर कामकाज करण्यात येत आहे. तसेच मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडुन सूचना प्राप्त झाल्याप्रमाणे आपत्कालीन बाब म्हणून मान्यता देणेत आलेली आहे. M/s. AAA Healthcareयांना दि.२९.०३.२०२१ ते २८.०५.२०२१दोन महीन्यासाठी कामकाज आदेश देण्यात आलेले आहेत याकामी एकूण र.रु. २५,००,०००/-खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९२ विषय क्रमांक- १४

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- वैद्यकिय

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश संदर्भ-

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/४/कावि/७७४/२०२१,दि.१७/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

भारतीय साथरोग अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3) क नुसार कोरोना विषाणुचा (COVID19) प्रादुर्भाव लक्षात घेता व पिंपरी चिंचवड शहरामधील वाढत्या कोविड१९ आजाराचा प्रादुर्भाव लक्षात घेता व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे अतिदक्षता विभाग (ICU) चालविणेकरीता असलेल्या मनुष्यबळाची कमतरता लक्षात घेता, मनपाचे रुग्णालयातील ICUबेड खाजगी संस्थेस चालविणेस देणेकामी Expression of Interst (EOI) क्र. 4/2020-21 प्रसिध्द करणेत आलेले होते. सदर (EOI)

निविदेकरीता मनपाचे हॉस्पिटल मधील बेड संख्येनुसार दर मागविणेत आलेले होते. त्यानुसार मे. रुबी अलकेअर सर्विसेस प्रा.ली यांचे वायसीएम हॉस्पिटल मधील 15 बेडसाठी सादर केलेले दर र.रु.11,999/-कमी करुन र.रु. 7500/- प्रतिबेड/ प्रतिदिन असा सुधारित दर दिला आहे. त्याच दराने वायसीएम हॉस्पिटल मधील ICU-1 व ICU-2 ( 15+15 बेड)एकूण ३० बेडचे काम करणेस तयारी दर्शविली असुन, सदरचा दर स्वीकृत करणेकामी मा.आयुक्त यांनी दि. ०१/०८/२०२० राजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. या प्रमाणे त्यांना आत्ता पर्यंत पुढील प्रमाणे कामकाज आदेश देणेत आले आहेत.

| अ.क्र. | कामकाज कालावधी | कामकाज आदेश क्र | आदेश रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दि.०९.०९.२०२० ते दि.१०.११.२०२० | आमुका/११/कावि/१९७/२०२० | २,०२,५०,०००/- |
| २ | दि.१०.११.२०२० ते दि.०९.०२.२०२१ | मसाभां/०४/कावि/९९ए/२०२१ | २,०२,५०,०००/- |
| ३ | दि.१०.०२.२०२१ ते दि.३१.०५.२०२१ | मसाभां/०४/कावि/३९९/२०२१ | २,५२,००,०००/- |
| ४ | दि.०१.०६.२०२१ ते दि.३१.०७.२०२१ | मसाभां/०४/कावि/५८१/२०२१ | १,४६,४००००/- |

या प्रमाणे मे. रुबी एलकेअर सर्व्हीसेस यांना दिनांक ०१.०८.२०२१ ते ३१.०८.२०२१ पासुन एकमहीना (३१ दिवस) कालावधीसाठी आयसीयु ४८ साठी १५ बेड आणि आयसीयु ७० साठी १७ बेड एसे एकूण ३२ बेडसाठी मुदतवाढ दिलेनंतरएकूण र.रु. ७४,४०,०००/- पर्यंत कामकाज आदेश देणेत आले आहेत.एकूण र.रु. ७४,४०,०००/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९३ विषय क्रमांक- १५

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- उदयान/वृक्षसंवर्धन

सुचक- मा. फुगे भिमाबाई अनुमोदक- मा. भोईर सुरेश

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.उदयान/४/कावि/४२५/२०२१, दि.०२/०८/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र. ३/२०२१-२२ बाब क्र.४ अन्वये “ड” व “ह”क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषंगिक कामे करणे करीता मजुर कर्मचारी पुरविणे कामी **मे. मैत्री स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या** निविदा रक्कम रूपये-९,५९,७८०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणसाठ हजार सातशे ऐशीं फक्त) पेक्षा -०३.५८% या कमी दराची निविदा मंजुर दराने ४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये-९,२५,४२०/-(अक्षरी र.रु. नऊ लाख पंचवीस हजार चारशे वीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९४ विषय क्रमांक- १६

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- उदयान/वृक्षसंवर्धन

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.उदयान/४/कावि/४२२/२०२१, दि.०३/०८/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र. ३/२०२१-२२ बाब क्र.१ अन्वये "अ"व "फ"क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषंगिक कामे करणे करीता मजुर कर्मचारी पुरविणे कामी **मे.अथर्व स्वयं.औद्या.सेवा सह.संस्था मर्या**. निविदा रक्कम रूपये-९,५९,७८०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणसाठ हजार सातशे ऐंशीं फक्त) पेक्षा -०३.५८%या कमी दराची निविदा मंजुर दराने ४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये-९,२५,४२०/-(अक्षरी र.रु. नऊ लाख पंचवीस हजार चारशे वीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९५ विषय क्रमांक- १७

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- उदयान/वृक्षसंवर्धन

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.उदयान/४/कावि/४२३/२०२१,दि.०३/०८/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र. ३/२०२१-२२ बाब क्र.१ अन्वये "ब"व "ग"क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषंगिक कामे करणे करीता मजुर कर्मचारी पुरविणे कामी **मे.जी.बी.एन्टरप्रायजेस** निविदा रक्कम रूपये-९,५९,७८०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणसाठ हजार सातशे ऐंशीं फक्त) पेक्षा -०३.५८%या कमी दराची निविदा मंजुर दराने ४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये-९,२५,४२०/-(अक्षरी र.रु. नऊ लाख पंचवीस हजार चारशे वीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९६ विषय क्रमांक- १८

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग-उदयान/वृक्षसंवर्धन

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.उदयान/४/कावि/४२९/२०२१,दि.०५/०८/२०२१.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे वृक्षसंवर्धनविभागाकडील निविदा नोटीस क्र. ३/२०२१-२२ बाब क्र.३ अन्वये “क” व “ई”क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्याअनुषंगिक कामे करणे करीता मजुर कर्मचारी पुरविणे कामी **मे. मैत्री स्वयंरोजगार सेवा सह.संस्था मर्या** निविदा रक्कम रूपये-९,५९,७८०/- (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणसाठ हजार सातशे ऐशीं फक्त) पेक्षा -०३.५८**%**या कमी दराची निविदा मंजुर दराने ४ महिने कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये-९,२५,४२०/-(अक्षरी र.रु. नऊ लाख पंचवीस हजार चारशे वीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९७ विषय क्रमांक- १९

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- भुमि जिंदगी

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भुजि/८/कावि/९८/२०२१,दि.०७/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नोंदणी व मुद्रांक विभागास ,त्यांचे अभिलेख नोंदणीचे कामकाजासाठी जागा मिळणे बाबत सह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,पुणे शहर यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मालकीच्या बांधीव जागा मिळणे कामी मागणी केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासनाचे प्राप्त होणारे दरानुसार व नियमानुसार वाजवी भाडे आकारुन ५ वर्षासाठी सह दुय्यमनिबंधक चे कार्यालयास भाड्याने देणे.

| अ. क्र. | जागेचा तपशील | मागणी केलेले क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सुखवानी क्रिस्टल इमारत , पिंपरीगांव २७ गाळ्यापैंकी | २००० चौ.फुट |
| २ | औंध रावेत बीआरटी रोड,”ड” प्रभाग समोरील इमारत | १८०६ चौ. फुट |
| ३ | भोसरी भाजी मंडई वाणिज्य इमारत पहिला / दुसरा मजला | २००० चौ.फुट |
| ४ | भोसरी स्पाईनरोड क्लब हाऊस | २००० चौ.फुट |

सबब सह दुय्यम निबंधक वर्ग-२ कार्यालया करीता वरील नमुद मनपाच्या इमारती मधिल जागा देणे कामी मान्यतेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७९ “ ब ” नुसार मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- १०१९८ विषय क्रमांक- २०

दिनांक- ०१/०९/२०२१ विभाग- ग क्षेत्रिय जलनि:सारण

सुचक- मा. भोईर सुरेश अनुमोदक- मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.गक्षेका/जनि/कावि/७८२/२०२१,दि.१३/०८/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

